• वर्ष : ०३ • अंक : ३४० • पुणे • सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



सस्नेह निमंत्रण

दैनिक
## आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

DESIGN CONCEPT BY : SUNSHINE GRAPHICS DESIGN_8379928399

विश्वासाची चार वर्षे । सत्याची अखंड वाटचाल

## चौथा वर्धापन दिन... सोहळा

चार वर्षांच्या या प्रवासात
विश्वास मिळवला । नाती जपली । प्रश्न मांडले ।
आणि समाजहिताची
पत्रकारिता अधिक भक्कम केली!

## दै. आरंभ पर्वच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त

सर्व वाचक, जाहिरातदार, हितचिंतक, पत्रकार, प्रतिनिधी
आणि शुभेच्छुकांचे मनःपूर्वक आभार !

• **सौ. सुरेखा सावंत-मते** (संस्थापिका तथा संपादिका दै. आरंभ पर्व)

दिनांक : 11 सप्टेंबर 2026 | वार : शुक्रवार | वेळ : सायंकाळी 6 ते रात्री 10 पर्यंत

स्थळ : सिल्वर पेटल्स् (ए.सी. बँक्वेट हॉल) धायरी फाटा,
नऱ्हे रोड, लाडली साडी सेंटर लेन, वडगाव बु. पुणे 411041

आपली उपस्थितीच आमच्या चार वर्षांच्या प्रवासाला मिळालेली अमूल्य दाद आहे!

लोकेशन साठी स्कॅन करा

अधिक माहितीसाठी :
श्री.लक्ष्मण साबळे : 8605284272 | श्री.प्रतिक गंगणे : 7276314142

आपले स्नेहांकित, **दै. आरंभ पर्व परिवार**

(टिप : कृपया कार्यक्रमाला येताना पुष्पगुच्छ आणून नये त्याऐवजी शालेय साहित्य तसेच वाचनीय पुस्तके स्विकारली जातील.

## थोडक्यात पण महत्वाचे



### देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांच्या हातावर प्रेमाची राखी

पुणे (आरंभ पर्व) : देशाच्या सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी ऊन, वारा, पाऊस आणि कडाक्याची थंडी यांची पर्वा न करता अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या भारतीय जवानांच्या मनगटावर प्रेम, आपुलकी आणि कृतज्ञतेचा रेशीम धागा बांधत रक्षाबंधनाचा अनोखा सोहळा उत्साहात पार पडला. श्री शिवाजी मित्र मंडळ आणि साईनाथ मंडळ ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित या उपक्रमातून जवानांप्रति आदर आणि देशवासीयांच्या भावनिक नात्याची प्रचिती आली. जवानांना आपल्या कुटुंबापासून दूर राहावे लागू नये, त्यांना बहिणीच्या प्रेमाची आणि आपुलकीची उणीव भासू नये, या भावनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. मंडळाच्या माध्यमातून महिला, तरुणी आणि विद्यार्थिनींनी जवानांच्या मनगटावर राख्या बांधून त्यांचे औक्षण केले. यावेळी अनेक भगिनींचे डोळे भावनेने पाणावले, तर जवानांच्या चेहऱ्यावरही आपुलकीचा आनंद दिसून आला.



### पुण्यात १ ते ३ सप्टेंबरदरम्यान 'उर्गेन आर्ट फेस्टिव्हल'

पुणे (आरंभ पर्व) : करुणादिप फाउंडेशन आणि त्रिरत्न वैरोचना सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या १ ते ३ सप्टेंबरदरम्यान पुण्यात ' उर्गेन आर्ट फेस्टिव्हल २०२६' आयोजित करण्यात आला आहे. या तीन दिवसीय महोत्सवात चित्रप्रदर्शने, ध्यान कार्यशाळा, कलाकार व साहित्यिक परिसंवाद, चित्रपट प्रदर्शन तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती माजी चीफ मेडिकल ऑफिसर, डिफेन्स इस्टेट, इंडिया, संस्थापक करुणादीप फाऊंडेशन आणि उर्गेन आर्ट ग्लोबल डॉ. जीवक (व्ही. डी. गायकवाड) यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी डॉ अस्मिता गायकवाड, डायरेक्टर फोर्टरिया आणि उपाध्यक्षा करुणादीप फाऊंडेशन, जागतिक कीर्तीचे चित्रकार सविंद्र सावरकर आणि कलादिग्दर्शक संतोष संखद आदि मान्यवर उपस्थित होते. 'उर्गेन आर्ट फेस्टिव्हल २०२६' बद्दल अधिक माहिती देताना आयोजकांनी सांगितले की, महोत्सवाचे उद्घाटन १ सप्टेंबर रोजी बालगंधर्व कलादालन येथे सकाळी १० वाजता होणार असून, ज्येष्ठ चित्रकार सवी सावरकर यांच्या चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. या प्रसंगी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष पद्मश्री डॉ. सुखादेव थोरात, अभिनेते किरण माने आणि ज्येष्ठ पत्रकार राजू परूळेकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. दुपारी ३:०० वाजता चित्रकलेचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक होईल तर सायंकाळी 5 वाजता 'शिवाजी अंडरग्राऊंड इन भीमनगर मोहल्ल' या नाटकाचं प्रयोग होणार आहे. फेस्टिव्हल मध्ये २ सप्टेंबर रोजी सकाळी 10 वाजता ध्यान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

# हातमाग, स्थानिक कारागिरांसाठी केंद्र सरकारचा पुढाकार

## प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांचे प्रतिपादन; 'निरुपाज् येवला पैठणी अँड सिल्क सारीज'च्या दालनाचे उद्घाटन




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"भारताच्या विविध भागात वेगवेगळ्या प्रकारचे कापड प्रसिद्ध आहे. स्थानिक कारागिरांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आणि भारतीय हातमाग उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारकडून विविध उपक्रम राबविले जात आहेत. यामध्ये राष्ट्रीय हातमाग दिन, 'एमएसएमई' योजना, कारागिरांसाठी कर्जसुविधा आणि पारंपरिक व्यवसायांना प्रोत्साहन देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत," असे प्रतिपादन संसदीय समितीच्या अध्यक्षा व राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केले.

'निरुपाज् येवला पैठणी अँड सिल्क सारीज' या येवला पैठणीच्या अग्रगण्य ब्रँडच्या पुण्यातील भव्य दालनाचे उद्घाटन मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. ठाण्यानंतर 'निरुपाज्'ने आता पुण्यात मध्यवर्ती भागात भांडारकर रस्त्यावर शानदार दालन सुरू केले आहे. उद्घाटनावेळी निरुपाज्'च्या संस्थापिका निरुपा तायडे, त्यांच्या मातोश्री वंदना वझारे, अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, ईशम तायडे, दिलीप खैरे, धिरज वझारे, गणेश डोके, महेश गायकवाड, योगिता गायकवाड, तुषार खैरे, सारंग मगर, वैशाली डोके, रोहित डोके आदी उपस्थित होते.

प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "साडी हा महिलांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. तसेच भारतात साड्यांचा व्यवसाय मोठा असून, साड्या विणणे ही एक कला आहे. या कलेला प्रोत्साहन देण्याचे काम केंद्र सरकार सातत्याने करत आहे. पुण्यातील महिला चोखंदळ आहेत. त्यांना साड्यांची चांगली पारख आहे. 'निरुपाज्'च्या साड्या या स्थानिक कारागिरांना प्रोत्साहन देऊन तयार करण्यात आल्या आहेत, ही कौतुकाची बाब आहे. येत्या काळात रेल्वेस्थानकांवर वस्त्रदालने, स्थानिक हस्तकला उत्पादने यांना विक्रीसाठी जागा उपलब्ध करून देण्याचाही प्रयत्न सुरू आहे. या उपक्रमांमुळे पारंपरिक कला आणि व्यवसायांचे जतन होण्याबरोबरच ते पुढील पिढीपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे." निरुपा तायडे म्हणाल्या, "या दालनात ग्राहकांना येवल्याची अस्सल पैठणी आणि सिल्कच्या विविध प्रकारच्या साड्यांचे कलेक्शन पाहता आणि खरेदी करता येणार आहे. निरुपाज् साडीचे पुण्यातील हे पहिलेवहिले दालन असून, याठिकाणी दोन हजारांपासून सात लाख रुपयांपर्यंतच्या अस्सल हातमाग साड्या उपलब्ध आहेत. पारंपरिक येवला पैठणी, बनारसी, सिल्क, पटोला अशा पारंपरिक साड्यांबरोबरच जरदोसी वर्क, मोती वर्क केलेल्या नव्या पद्धतीच्या साड्यांचेही उत्तम कलेक्शन पाहता येणार आहे. अभिनेत्री प्राजक्ता माळी 'निरुपाज्'ची ब्रँड अँबेसेडर असून, नुकतीच कान्स चित्रपट महोत्सवाच्या रेड कार्पेटवर प्राजक्ताने 'निरुपाज्'ची साडी परिधान केली होती. याशिवाय केतकी माटेगावकर, अभिजित खांडकेकर यांसारख्या बऱ्याच सेलिब्रिटींनी येथून साडी खरेदीला पसंती दिलेली आहे. त्यामुळे सेलिब्रिटींमध्येही 'निरुपाज्' विशेष प्रसिद्ध आहे.

> प्रत्येक साडीचा पोत, फिनिशिंग याकडे विशेष लक्ष दिलेले असल्याने येथील साड्या वेगळ्या आहेत. अस्सल हातमागावर विणलेल्या आणि हाताने कारागिरी केलेल्या या साड्या आपण कारागिरांकडून तयार करुन घेतल्या आहेत. मराठमोळ्या साड्यांची समृद्ध परंपरा जपणारे 'निरुपाज् सारीज' ठाणे आणि मुंबईत तर प्रसिद्ध आहेच. पण आता पुण्यातही नव्याने ओळख निर्माण करण्याच्या दृष्टीने हे दालन महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. येत्या ७ दिवसांत जे ग्राहक दालनात येऊन साडी खरेदी करतील त्यांना साड्यांवर विशेष सूट देणार असल्याचे निरुपा तायडे यांनी सांगितले.

## आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त अन्नधान्याचे वाटप

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार श्री. भीमराव अण्णा तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी खडकवासला ग्रामीणच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत डोणजे (गोळेवाडी) येथील 'आपलं घर' अनाथ मुलांच्या आश्रमात अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे यंदाही रविवार, दिनांक ३० ऑगस्ट २०२६ रोजी हा उपक्रम आयोजित करण्यात आला. वाढदिवसाचा आनंद समाजातील गरजू व निराधार घटकांसोबत साजरा करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी भारतीय जनता पार्टी खडकवासला ग्रामीणचे अध्यक्ष श्री. नवनाथभाऊ तागुंदे, महाराष्ट्र प्रदेश दिव्यांग आघाडी अध्यक्ष श्री. बाजीराव नाना पारगे, युवा मोर्चा अध्यक्ष श्री. शरद (लालाशेठ) जावळकर, पुणे जिल्हा भाजप उपाध्यक्ष श्री. सचिनभाऊ पायगुडे, पंचायत राज व ग्रामविकास मंडळाच्या अध्यक्षा



सौ. ताराबाई (अक्का) नानगुडे, खडकवासला मतदारसंघ महिला अध्यक्षा सौ. संतोषीताई दारवटकर, जिल्हा उपाध्यक्ष श्री. विठ्ठलभाऊ ठाकर, तसेच सौ. मंगलताई कोडीतकर यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. याप्रसंगी श्री. दत्ताभाऊ पायगुडे, श्री. राजाराम माताळे, श्री. नारायण तनपुरे, श्री. किरणभाऊ खिरीड, श्री. विकासभाऊ पारगे, श्री. विश्वनाथ जावळकर, श्री. राजूशेठ भामे, श्री. विकासभाऊ गायकवाड, श्री. माऊलीभाऊ रोकडे तसेच भारतीय जनता पार्टीचे विविध पदाधिकारी उपस्थित होते. आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

## पहाटे हातात झाडू... अन् रक्षाबंधनाला मनगटावर राखीचा सन्मान!

### शहर स्वच्छ करणाऱ्या भगिनींसाठी यशवंत लायगुडेंनी जपले भावाचे नाते

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पहाट अजून पूर्णपणे उजाडलेली नसते... अनेकांच्या घरात झोपेची शांतता असते... पण त्याच वेळी काही हात शहर स्वच्छ करण्यासाठी कामाला लागलेले असतात. हातात झाडू, डोक्यावर जबाबदाऱ्यांचे ओझे आणि चेहऱ्यावर कुटुंबासाठी जगण्याची धडपड घेऊन या सफाई कर्मचारी भगिनी आपले कर्तव्य पार पाडत असतात.





आपण स्वच्छ रस्त्यांवरून चालतो, स्वच्छ परिसरात राहतो; मात्र त्या स्वच्छतेमागे घाम गाळणाऱ्या या हातांची दखल अनेकदा घेतली जात नाही. अशाच कष्टकरी भगिनींच्या आयुष्यात रक्षाबंधनाच्या निमित्ताने आपुलकीचा आणि माणुसकीचा एक सुंदर क्षण आला.

भारतीय जनता पक्षाचे धायरी-वडगाव बुद्रुक मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे यांनी सफाई कर्मचारी महिलांसोबत रक्षाबंधन साजरे केले. या भगिनींनी लायगुडे यांच्या मनगटावर राखी बांधली आणि एका क्षणात हा कार्यक्रम केवळ औपचारिक सोहळा न राहता भावनिक नात्याचा उत्सव बनला.

रोज दुसऱ्यांचे शहर स्वच्छ करणाऱ्या या भगिनींना त्या दिवशी स्वतःच्या कष्टाचा सन्मान मिळाला. त्यांच्या हातातील झाडूकडे नव्हे, तर त्यांच्या मनातील संघर्षाकडे पाहणारा एक आपुलकीचा दृष्टिकोन त्यांना मिळाला.

लायगुडे यांनी भगिनींना साडी-चोळी व भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान केला. मात्र या भेटवस्तूंपेक्षाही त्यांच्यासाठी महत्त्वाची होती ती "आम्हालाही कोणी आपले मानते" ही भावना. राखी बांधताना अनेक भगिनींच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. रोजच्या धकाधकीच्या जीवनात, कुटुंबाच्या जबाबदाऱ्या सांभाळत आणि समाजासाठी काम करत असताना मिळालेला हा सन्मान त्यांच्या मनाला स्पर्शून गेला. "आम्ही रोज काम करतो, पण आमच्या कामाची अशी दखल घेतली जाईल, असे वाटले नव्हते. आज राखी बांधताना खऱ्या अर्थाने भावाचे प्रेम मिळाल्यासारखे वाटले," अशी भावना उपस्थित भगिनींनी व्यक्त केली. रक्षाबंधन म्हणजे केवळ बहिणीने भावाच्या मनगटावर राखी बांधण्याचा सण नाही; तर संकटात एकमेकांच्या पाठीशी उभे राहण्याचे वचन आहे. याच भावनेतून शहर स्वच्छ ठेवणाऱ्या या भगिनींसोबत जुळलेले नाते अधिक घट्ट झाले.

> पहाटे शहरासाठी झाडू उचलणाऱ्या हातांना, त्या दिवशी मायेचा आणि सन्मानाचा स्पर्श मिळाला... आणि राखीच्या एका छोट्याशा धाग्याने कष्टकरी भगिनींच्या आयुष्यात आपलेपणाचा मोठा अर्थ निर्माण केला. "ज्यांच्या हातांनी शहर स्वच्छ राहते, त्या हातांवर सन्मानाची राखी बांधली गेली... हाच या रक्षाबंधनाचा खरा अर्थ ठरला!"

# हिमालय 'टाइम बॉम्ब'च्या उंबरठ्यावर; नेपाळच्या महापुरातून धोक्याची घंटा

## हिमनद्यांचे वितळणे, ग्लेशियल तलावांचा वाढता धोका आणि बेफाम बांधकामांमुळे हिमालयीन प्रदेशाची असुरक्षितता गंभीर

**(दै. आरंभ पर्व)**

**नेपाळमध्ये निर्माण झालेली महापूरस्थिती ही केवळ एका नैसर्गिक आपत्तीची घटना म्हणून पाहून चालणार नाही. या दुर्घटनेने संपूर्ण हिमालयीन पट्ट्यासमोर उभ्या ठाकलेल्या हवामान बदलाच्या गंभीर संकटाकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले आहे. तिबेटसह उच्च हिमालयीन भागात बर्फ आणि हिमनद्यांच्या बदलत्या स्थितीमुळे उत्तर नेपाळातील रसुवा आणि सीमावर्ती परिसरात अचानक पूरस्थिती निर्माण झाल्याचे वृत्त आहे. या आपत्तीत मोठ्या प्रमाणावर जीवित आणि वित्तहानी झाल्याची भीती असून, बचाव आणि मदतकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. नेपाळच्या सशस्त्र पोलीस दलातील १३ जवान बेपत्ता असल्याची माहितीही समोर आली आहे.**




या दुर्घटनेमागे हिमनद्यांमधील बदल, बर्फाचे वेगाने वितळणे आणि त्यातून नदीपात्रात अचानक मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग होणे यांसारखे घटक कारणीभूत असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, आपत्तीचे नेमके कारण आणि नुकसानीचे अचूक स्वरूप स्पष्ट होण्यासाठी अधिकृत तपास, भौगोलिक अभ्यास आणि वैज्ञानिक मूल्यांकन आवश्यक आहे.

**हिमालयातील बदल आता धोक्याच्या सीमारेषेवर**

हिमालय हा केवळ बर्फाने आच्छादलेला पर्वतीय प्रदेश नाही. भारत, नेपाळ, भूतान, चीन आणि पाकिस्तान या देशांच्या जलसुरक्षेचा तो महत्त्वाचा आधार आहे. गंगा, ब्रह्मपुत्रा आणि सिंधू यांसारख्या विशाल नदीप्रणालींना हिमालयातून पाणी मिळते. त्यामुळे हिमनद्यांमध्ये होणारा बदल हा केवळ पर्वतांपुरता मर्यादित राहत नाही; त्याचे पडसाद शेती, पिण्याचे पाणी, जलविद्युत, पर्यटन आणि कोट्यवधी लोकांच्या उपजीविकेवर उमटतात.

हवामान बदलामुळे उच्च हिमालयीन भागातील तापमानवाढ, हिमवृष्टीच्या स्वरूपातील बदल आणि बर्फ वितळण्याच्या प्रक्रियेत झालेली वाढ ही चिंतेची बाब आहे. ज्या उंचीवर पूर्वी मोठ्या प्रमाणावर हिमवृष्टी होत असे, त्या परिसरात आता काही वेळा पावसाचे प्रमाण वाढताना दिसते. परिणामी, हिमनद्यांवर जमा होणाऱ्या बर्फाच्या साठ्यात घट होत असून त्यांचा नैसर्गिक समतोल बिघडत आहे.

**'अल्बिडो इफेक्ट'चे दुष्टचक्र**

हिमाच्छादित प्रदेश सूर्यकिरणांचा मोठा भाग परावर्तित करतो. या परावर्तनक्षमतेला 'अल्बिडो' म्हणतात. मात्र, बर्फाचे आवरण कमी झाले की काळे खडक आणि माती उघडी पडतात. हे पृष्ठभाग सूर्याची उष्णता अधिक प्रमाणात शोषून घेतात. त्यामुळे स्थानिक तापमान वाढते आणि बर्फ वितळण्याची प्रक्रिया आणखी वेगाने सुरू होते.

म्हणजेच, तापमानवाढ बर्फ वितळणे अल्बिडो कमी होणे अधिक उष्णता शोषली जाणे आणखी बर्फ वितळणे, असे धोकादायक दुष्टचक्र निर्माण होते. हिमालयातील उंचीनुसार तापमानवाढीतील फरकाला 'एलिवेशन-डिपेंडंट वॉर्मिंग' असे संबोधले जाते. या प्रक्रियेचा हिमनद्यांवर होणारा परिणाम दीर्घकालीन दृष्टीने अत्यंत गंभीर ठरू शकतो.

**लहान हिमनद्या आणि ग्लेशियल तलाव अधिक धोकादायक**

मोठ्या हिमनद्या हवामानातील बदलांना तुलनेने संथ प्रतिसाद देतात; परंतु लहान हिमनद्या आणि त्यांच्याशी संबंधित जलप्रवाह तुलनेने जलद बदलू शकतात. हिमनद्यांच्या काठावर किंवा मागे वितळलेल्या बर्फामुळे पाण्याची तळी निर्माण होतात. या तळ्यांना 'ग्लेशियल लेक्स' म्हटले जाते.

अनेक वेळा या तलावांना बर्फ, माती किंवा खडकांचे नैसर्गिक अडथळे असतात. हे अडथळे कमकुवत झाले किंवा अचानक तुटले, तर प्रचंड प्रमाणात पाणी, गाळ आणि दगड काही मिनिटांत किंवा तासांतच खालील दऱ्यांमध्ये धावून येऊ शकतात. या घटनेला 'ग्लेशियल लेक आउटबर्स्ट फ्लड' अर्थात GLOF म्हटले जाते.

यातील सर्वात गंभीर बाब म्हणजे अशा आपत्तींसाठी पारंपरिक पूरव्यवस्थापन यंत्रणा पुरेशी ठरण्याची शक्यता कमी असते. कारण पाण्याचा विसर्ग अत्यंत अचानक आणि वेगाने होऊ शकतो.

**केदारनाथ आणि रैणीच्या घटना विसरता येणार नाहीत**

२०१३ मधील केदारनाथ आपत्तीने हिमालयीन प्रदेशातील अतिवृष्टी, भूस्खलन, नदीप्रवाहातील बदल आणि मानवी हस्तक्षेप यांचे विनाशकारी परिणाम जगासमोर आणले. त्यानंतर २०२१ मधील रैणी परिसरातील दुर्घटनेने हिमनदी, बर्फ, खडक आणि नदीप्रवाह यांच्यातील परस्परसंबंध किती वेगाने आपत्तीमध्ये रूपांतरित होऊ शकतो, हे दाखवून दिले.

मात्र, प्रत्येक हिमालयीन आपत्तीचे कारण केवळ 'ग्लोबल वॉर्मिंग' आहे, असे म्हणणे शास्त्रीयदृष्ट्या योग्य ठरणार नाही. अतिवृष्टी, ढगफुटी, भूस्खलन, भूकंपीय हालचाली, हिमनद्यांची स्थानिक स्थिती, नदीपात्रातील बदल आणि मानवी हस्तक्षेप अशा अनेक घटकांचा एकत्रित परिणाम आपत्तीची तीव्रता वाढवू शकतो.

तरीही हवामान बदल हा या टोकाच्या घटनांची शक्यता आणि संभाव्य तीव्रता वाढवणारा महत्त्वाचा घटक ठरत आहे, हे दुर्लक्षित करून चालणार नाही.

**विकास हवा; पण विनाशाच्या किंमतीवर नको**

हिमालयात रस्ते, बोगदे, धरणे, जलविद्युत प्रकल्प आणि पर्यटनासाठी मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा उभारल्या जात आहेत. विकासाची गरज निश्चितच आहे. परंतु अतिसंवेदनशील पर्वतीय प्रदेशात विकासाचे निकष मैदानी भागांप्रमाणे ठरवणे धोकादायक ठरू शकते. भूगर्भीय रचना, उतारांची स्थिरता, नदीखोऱ्यांची क्षमता, हिमनद्यांची स्थिती आणि हवामानातील बदल यांचा पुरेसा विचार न करता होणारी बांधकामे भविष्यात आपत्तीची तीव्रता वाढवू शकतात. पर्यावरणाची वहनक्षमता ही विकासाच्या मार्गातील अडथळा नसून सुरक्षित विकासाची पूर्वअट आहे.

**आता 'आपत्तीनंतरची मदत' नव्हे, तर 'आपत्तीपूर्व तयारी' हवी**

हिमालयीन देशांनी आता आपत्ती व्यवस्थापनाच्या पारंपरिक चौकटीपलीकडे जाण्याची वेळ आली आहे. हिमनद्यांचे उपग्रह आणि जमिनीवरील तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सातत्याने निरीक्षण करणे, संभाव्य धोकादायक ग्लेशियल तलावांचे मॅपिंग करणे, नदीखोऱ्यांचे जोखीम नकाशे तयार करणे आणि अत्याधुनिक पूर्वसूचना प्रणाली उभारणे ही काळाची गरज आहे. स्थानिक नागरिकांना आपत्तीची पूर्वकल्पना देण्यासाठी प्रभावी सायरन, मोबाइल अलर्ट, स्थानिक नियंत्रण केंद्रे आणि सुरक्षित स्थलांतर मार्ग तयार केले पाहिजेत. अतिसंवेदनशील भागांमध्ये कोणत्या प्रकारचे बांधकाम परवानगीयोग्य आहे, यासाठी कठोर नियम असणे आवश्यक आहे.

प्रत्येक मोठ्या प्रकल्पापूर्वी पर्यावरणीय वहनक्षमता अभ्यास आणि व्यापक आपत्ती जोखीम मूल्यांकन अनिवार्य केले पाहिजे.

**हिमालय वाचवणे म्हणजे भविष्यातील जलसुरक्षा वाचवणे**

आज नेपाळमध्ये दिसणारे संकट उद्या उत्तराखंड, हिमाचल प्रदेश किंवा हिमालयाच्या इतर भागांसमोर उभे राहू शकते. म्हणून एखादी दुर्घटना घडल्यावर काही दिवस चर्चा करणे आणि नंतर सर्व काही विसरून जाणे हा मार्ग आता स्वीकारता येणार नाही.

हवामान बदलाला आळा घालण्यासाठी जागतिक प्रयत्न आवश्यक आहेतच; परंतु त्याचबरोबर हिमालयासाठी स्वतंत्र, वैज्ञानिक आणि दीर्घकालीन धोरणाची गरज आहे. हिमनद्यांचे संरक्षण, जलस्रोतांचे व्यवस्थापन, पर्यावरणपूरक पायाभूत विकास आणि स्थानिक समुदायांचा सहभाग या चारही बाबी एकत्रितपणे पुढे न्याव्या लागतील. हिमालय आपल्याला इशारा देत आहे. प्रश्न एवढाच आहे की आपण तो इशारा किती गांभीर्याने घेतो.

आजची महापूरस्थिती ही केवळ एक दुर्घटना समजून दुर्लक्षित केली, तर भविष्यात अशाच घटना अधिक वारंवार, अधिक तीव्र आणि अधिक विनाशकारी स्वरूपात समोर येऊ शकतात. हिमालयाला विकासाची गरज आहे; पण त्याच्या नैसर्गिक मर्यादा ओलांडून केलेला विकास अखेर मानवासाठीच महाविनाशाचे कारण ठरू शकतो.

•••



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६






## थोडक्यात पण महत्वाचे

### ‘हसरतें’चा चौथा सीझन प्रेक्षकांच्या भेटीला




मुंबई (आरंभ पर्व) : महिलांच्या इच्छा, संघर्ष, नातेसंबंध आणि स्वतःचा शोध यांची भावनिक मांडणी करणाऱ्या हसरतें या अँथॉलॉजी सीरिजचा चौथा सीझन हंगामा ओटीटीवर प्रदर्शित झाला आहे. या सीझनमध्ये महिलांच्या खासगी आयुष्यातील भावनिक संघर्ष आणि स्वतःच्या अटींवर जगण्याची त्यांची धडपड दाखवणाऱ्या सहा कथा आहेत. ‘छू कर मेरे मन को’ आणि ‘फाइंडिंग व्हॉइस’ हे पहिले दोन भाग 25 ऑगस्टला प्रदर्शित झाले असून, ‘झटपट आरती’ आणि ‘मकान मालिक’ हे भाग 1 सप्टेंबरला, तर ‘रनअवे मदर’ आणि ‘यू आर प्रिटी’ हे भाग 8 सप्टेंबरला प्रदर्शित होणार आहेत. या सीझनमध्ये निशा रावल, ध्रुव चौधरी, मीरा देवस्थळे, झान खान, आकांक्षा पुरी, रेयांश वीर चड्डा, चाहत खन्ना, अंश बागरी आणि अमिका शैल यांच्या प्रमुख भूमिका आहेत. महिलांनी स्वतःचा आवाज, आत्मविश्वास आणि निर्णयक्षमता पुन्हा मिळवण्याच्या प्रवासावर आधारित या कथा प्रेक्षकांसाठी भावनिक आणि विचारप्रवर्तक ठरणार आहेत.

### 1 Financeकडून मंजू ढाके यांची पार्टनर म्हणून नियुक्ती



मुंबई (आरंभ पर्व) : वैयक्तिक आर्थिक सल्ला आणि वेल्थ-टेक क्षेत्रातील 1 Financeने मंजू ढाके यांची पार्टनर म्हणून नियुक्ती केली आहे. पुण्यातील कंपनीच्या फायनान्शियल प्लॅनिंग सेंटरचे नेतृत्व तसेच पुण्यातील ग्राहकांसाठी आर्थिक सल्ला सेवा मजबूत करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. मंजू ढाके यांना विमा, आर्थिक सल्ला, वितरण आणि वित्तीय सेवा क्षेत्रातील 20 वर्षांहून अधिक अनुभव आहे. त्यांनी ICICI Prudential Life, HDFC Life, L&T Finance यांसह विविध संस्थांमध्ये काम केले असून 1 Financeमध्ये विमा सल्ला सेवा उभारण्यातही महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांनी ‘Insurance Made Simple’ हे पुस्तकही लिहिले आहे. पुण्यातील नव्या जबाबदारीत त्या प्रशिक्षित आर्थिक सल्लागारांची टीम उभारणे, ग्राहकांना गुंतवणूक, विमा, कर नियोजन, कर्ज, निवृत्ती आणि वारसाहक्क नियोजनाबाबत मार्गदर्शन करणे यावर भर देणार आहेत. 1 Financeचे CEO व सह-संस्थापक केवल भानुशाली यांनी ढाके यांच्या अनुभवाचा पुण्यातील आर्थिक सल्ला सेवा विस्तारासाठी मोठा फायदा होईल, असा विश्वास व्यक्त केला.

### एएमएनएस पारादीप लॉजिस्टिक्सला ३० वर्षांची कॅप्टिव्ह बर्थ सवलत

AM/NS INDIA

मुंबई (आरंभ पर्व) : पारादीप पोर्ट प्राधिकरणाने (पीपीए) एएम/एनएस इंडियाच्या एएमएनएस पारादीप लॉजिस्टिक्स प्रायव्हेट लिमिटेडला ड्राय बल्क कार्गो हाताळणीसाठी सीक्यू-III बर्थच्या यांत्रिकीकरणाकरिता ३० वर्षांसाठी ‘अवॉर्ड ऑफ कन्सेशन’ मंजूर केले आहे. या बर्थची क्षमता १० एमटीपीए असून, २१ ऑगस्ट रोजी ओडिशातील पारादीप येथे झालेल्या समारंभात केंद्रीय बंदरे, नौवहन व जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सुविधेमुळे एएम/एनएस इंडियाच्या पेलेट प्लांट कॉम्प्लेक्सपासून पारादीप बंदरातील बर्थपर्यंत पूर्णपणे यांत्रिकीकरण केलेल्या कन्व्हेयर प्रणालीद्वारे लोहखनिज पेलेटची वाहतूक करता येणार आहे. पारादीप ते हजिरा या मार्गावरील किनारपट्टी जलवाहतुकीला यामुळे अधिक चालना मिळणार असून, कंपनीची लॉजिस्टिक्स कार्यक्षमता वाढण्यासह वाहतुकीचा पर्यावरणीय परिणाम कमी करण्यास मदत होणार आहे. हा करार एएम/एनएस इंडियाच्या पुरवठा साखळी आणि लॉजिस्टिक्स क्षमता बळकट करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. समारंभाला ओडिशा सरकारचे राज्यमंत्री संपद चंद्र स्वेन, खासदार विभू प्रसाद तराई तसेच पारादीप पोर्ट प्राधिकरण आणि एएम/एनएस इंडियाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### बजाज जनरल इन्श्युरन्सची ‘माय फॅमिली कम्प्लीट’ पॉलिसी

BAJAJ GENERAL CARINGLY YOURS

पुणे (आरंभ पर्व) : बजाज जनरल इन्श्युरन्सने ‘माय फॅमिली कम्प्लीट’ ही अभिनव हेल्थ इन्श्युरन्स पॉलिसी जाहीर केली आहे. या पॉलिसीद्वारे प्रथमच कुटुंबाच्या हेल्थ कव्हरेजमध्ये पाळीव कुत्रे आणि मांजरे यांचाही समावेश करण्यात आला आहे. या प्लॅनमध्ये ₹5 लाख ते ₹5 कोटीपर्यंत सम इन्श्युअर्डचे पर्याय असून, पाच वर्षांपर्यंतचा पॉलिसी कालावधी उपलब्ध आहे. मानवांसोबत पाळीव प्राण्यांसाठीही विविध आरोग्यविषयक आणि विशेष सुविधा देण्यात आल्या आहेत. यामध्ये हॉस्पिटलायझेशन, प्री-पोस्ट हॉस्पिटलायझेशन, आधुनिक उपचार पद्धती तसेच पाळीव प्राणी हरवल्यास शोधासाठी होणारा खर्च, आपत्कालीन पेट स्टे आणि थर्ड-पार्टी लायबिलिटी कव्हर यांचा समावेश आहे. याशिवाय डबल सम इन्श्युअर्ड, ग्लोबल कव्हर, गंभीर आजार व अपघात मल्टिप्लायर, पेट अ‍ॅडॉप्शन सपोर्ट आणि ‘बंडल ऑफ जॉय’ यांसारखे पर्यायी कव्हरही उपलब्ध आहेत. पाळीव प्राणी हे कुटुंबाचा अविभाज्य भाग आहेत, ही भावना लक्षात घेऊन ही पॉलिसी तयार करण्यात आल्याचे कंपनीने सांगितले.

# “शिवरायांच्या शपथभूमीतून ‘निरोगी समाजा’चा संकल्प”



> “रायरेश्वरावर केवळ ट्रेक करण्यासाठी नाही, तर इतिहासाला नमन करून आरोग्यदायी समाज घडवण्याचा संकल्प करण्यासाठी आलो होतो. या पावन भूमीत घेतलेली आरोग्यसेवेची शपथ आम्हाला पुढील कार्यासाठी निश्चितच प्रेरणा देईल,” अशी भावना सविता पालसांडे, वेलनेस कोच यांनी व्यक्त केली.

**दौंड (दै. आरंभ पर्व)**

श्रावण महिना आणि आमचे सीनियर कोच शाहीर शेटे सर यांच्या जन्मदिवसाच्या औचित्य साधत रायरेश्वराच्या पावन भूमीत भगवान शिवाचे दर्शन, ऐतिहासिक वारशाचा अनुभव आणि समाजाला निरोगी जीवनशैली देण्याचा संकल्प अशा त्रिसूत्री उपक्रमातून वेलनेस कोचेसचा प्रेरणादायी ट्रेक उत्साहात पार पडला.

वेलनेस क्षेत्रातील सीनियर वेलनेस कोच शाहीर शेटे व त्याचे सहकारी यांच्या पुढाकारातून हा विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला. रायरेश्वराच्या ऐतिहासिक भूमीवर सर्व वेलनेस कोचेसना एकत्र घेऊन जाणे आणि वाढदिवसानिमित्त या पावन स्थळी प्रेरणादायी दिवस साजरा करण्याची संकल्पना यामागे होती.

रायरेश्वर हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या संकल्पाशी जोडलेले ऐतिहासिक स्थान आहे. शिवरायांनी याच भूमीत स्वराज्य स्थापनेची शपथ घेतल्याची ऐतिहासिक नोंद आहे. त्यामुळे या भूमीवर पोहोचल्यावर इतिहास प्रत्यक्ष अनुभवण्याची भावना सर्वांच्या मनात निर्माण झाली. ट्रेकदरम्यान रायरेश्वर पठारावरील सह्याद्रीच्या पर्वतरांगा, डोंगर-दऱ्या, धबधबे, तळी, दाट धुके आणि मनमोहक निसर्गदृश्यांचा सर्वांनी मनमुराद आनंद घेतला. रायरेश्वर पठाराची भौगोलिक रचना, इतिहास आणि तेथील प्राचीन मंदिरांविषयी स्थानिक मार्गदर्शकांकडून माहितीही मिळाली. लांबचा प्रवास आणि ट्रेकचा थकवा निसर्गाच्या सान्निध्यात अक्षरशः विसरून गेला. या उपक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सर्व वेलनेस कोचेसनी रायरेश्वराच्या पावन भूमीत ‘जास्तीत जास्त लोकांपर्यंत आरोग्य आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश पोहोचवण्याची’ सामूहिक शपथ घेतली. स्वतः निरोगी राहण्याबरोबरच समाजातील प्रत्येक व्यक्तीला आरोग्याबाबत जागरूक करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

ट्रेकनंतर सर्वांनी घेतलेल्या सात्त्विक व पारंपरिक भोजनाचाही विशेष आनंद घेतला. निसर्ग, अध्यात्म, इतिहास, आरोग्य आणि मैत्री यांचा सुंदर संगम या उपक्रमातून अनुभवायला मिळाला. या उपक्रमात अनेक वेलनेस कोचेस सहभागी झाले होते. सर्वांनी ट्रेकिंग, निसर्गरम्य वातावरण आणि ऐतिहासिक वारशाचा आनंद घेत हा दिवस अविस्मरणीय केला

## सोलिटेअर फेस्टिव्हल ऑफ इंडिया २०२६ अंतिम टप्प्यात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

THE SOLITAIRE FESTIVAL OF INDIA

डिव्हाईन सोलिटेअर्सचा प्रमुख वार्षिक ग्राहक महोत्सव ‘द सोलिटेअर फेस्टिव्हल ऑफ इंडिया’ (TSFI) २०२६ आता अंतिम आठवड्यात दाखल झाला आहे. १ ऑगस्टपासून देशभरातील २०० हून अधिक भागीदार ज्वेलरी स्टोअर्सच्या माध्यमातून सुरू असलेल्या या महोत्सवाला ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, अंतिम टप्प्यात डिव्हाईन सोलिटेअर्सने आणखी आकर्षक उत्सवी ऑफर्स जाहीर केल्या आहेत. २७ आणि २८ ऑगस्ट रोजी खरेदी करणाऱ्या ग्राहकांना त्यांच्या निश्चित भेटवस्तूंवर विशेष अपग्रेड मिळणार आहे. याशिवाय आपल्या दागिन्यांना वैयक्तिक स्पर्श देऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी नावाचे आद्याक्षर कोरण्याची सुविधा कोणत्याही अतिरिक्त शुल्काशिवाय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## ‘एक मुठी अनाज’मधून संस्कार स्कूलचा माणुसकीचा संदेश

**दौंड (दै. आरंभ पर्व)**



संस्कार प्रायमरी अँण्ड हायस्कूलच्या विद्यार्थ्यांच्या वतीने सोमवार, दि. २४ ऑगस्ट व मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी ‘एक मुठी अनाज’ हा सामाजिक उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत स्व. सुभाष आण्णा कुल मतिमंद व बहुविकलांग मुलांची शाळा, पासलकर वस्ती, दौंड तसेच सद्गुरू साईबाबा आश्रमशाळा, गिरीम, दौंड या दोन्ही ठिकाणी धान्यवाटप करण्यात आले. इयत्ता ६ वीच्या अभ्यासक्रमातील सामाजिक बांधिलकी, सहकार्य व संवेदनशीलता या मूल्यांना अनुसरून इयत्ता ६ वीच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात विशेष पुढाकार घेतला. त्यांच्या या पुढाकाराला नर्सरी ते इयत्ता १० वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग व मोलाची मदत देत उत्तम प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे धान्य संकलित करून गरजू मुलांसाठी मदतीचा हात पुढे केला. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकातील मूल्ये शिकण्याऐवजी ती प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याची संधी मिळाली. सहकार्य, दातृत्व, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारी यांचा सुंदर संगम या उपक्रमातून अनुभवायला मिळाला.

या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी संस्थापक मा. श्री. जयंत पवार सर व मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. प्रतिभा पवार मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी सौ. प्रीती गंगावणे यांनी केली. ‘शिक्षणातून संस्कार आणि संस्कारातून माणुसकी’ हा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## वीर शिवराज मंडळ ट्रस्टने पटकावला संजीवनी करंडक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




संजीवनी मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘संजीवनी करंडक सार्वजनिक गणेशोत्सव देखावा स्पर्धा २०२५’ चा पारितोषिक वितरण समारंभ शिवदर्शन येथील स्व. राजीव गांधी ई-लर्निंग प्रेक्षागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. स्पर्धेतील मानाचा ‘संजीवनी करंडक’ वीर शिवराज मंडळ ट्रस्टने पटकावला. या कार्यक्रमास संजीवनी मित्र मंडळाचे अध्यक्ष संजय विद्वांस, कसबा गणपती मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत शेटे, ज्येष्ठ शिल्पकार विवेक खटावकर, सेवा मित्र मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोहिते, आदर्श मंडळाचे अध्यक्ष उदय जगताप, साईनाथ मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष पियूष शहा, दर्शन मित्र मंडळाचे अध्यक्ष गणेश घोश, नगरसेवक महेश वाबळे, शिवव्याख्याते सौरभ कर्डे, राजेंद्र भिडे यांच्यासह विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रास्ताविकात संजीवनी मित्र मंडळाचे अध्यक्ष संजय विद्वांस यांनी मंडळाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांची माहिती दिली. सार्वजनिक गणेशोत्सवातील देखाव्यांच्या माध्यमातून कलात्मकता, सामाजिक प्रबोधन आणि सांस्कृतिक मूल्यांना व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या पूर्वार्धात नटरंग संस्थेच्या कलाकारांनी ‘त्रिपुंड’ या कार्यक्रमाची प्रभावी भरतनाट्यम प्रस्तुती सादर केली. कलावंतांच्या उत्कृष्ट सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. यावेळी श्रीकांत शेटे यांनी संजीवनी मित्र मंडळाच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्याचे कौतुक केले. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजप्रबोधनासोबतच कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देण्याचे काम मंडळ सातत्याने करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

## राखी २०२६च्या खरेदीत मीशोवर ३६% वाढ; नॉन-मेट्रो भारताचा ७३% वाटा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

meesho

यंदाच्या राखी सणानिमित्त ऑनलाइन खरेदीला मोठी चालना मिळाली असून, मीशोवरील राखीच्या ऑर्डर्समध्ये मागील वर्षाच्या तुलनेत तब्बल ३६ टक्के वाढ झाली आहे. गेल्या महिनाभरातील राखी शॉपिंग कालावधीत प्लॅटफॉर्मच्या ग्रॉस मर्चेंडाइज व्हॅल्यू (GMV) मध्येही सुमारे ३८ टक्के वाढ नोंदवण्यात आली. विशेष म्हणजे, या वाढीत देशातील मोठ्या महानगरांपेक्षा नॉन-मेट्रो शहरांचा मोठा वाटा राहिला. मीशोवरील राखीच्या एकूण ऑर्डर्सपैकी सुमारे ७३ टक्के ऑर्डर्स नॉन-मेट्रो बाजारपेठांमधून आल्या. टियर-३ आणि टियर-४ शहरांमध्ये सर्वाधिक वेगाने वाढ झाल्याने सणासुदीच्या ऑनलाइन खरेदीचा विस्तार आता लहान शहरांपर्यंत पोहोचल्याचे चित्र आहे. उत्तर प्रदेशातील दादरी या लहान औद्योगिक शहराने राखीच्या ऑर्डर्समध्ये सुमारे १०५ टक्के वार्षिक वाढ नोंदवत आघाडी घेतली. त्यानंतर ओडिशातील नबरंगपूर, तसेच कासगंज, धमतरी आणि मध्य प्रदेशातील नैनपूर या शहरांमध्येही राखीच्या खरेदीत लक्षणीय वाढ झाली.

# डॉ. फिक्सिटकडून वारकऱ्यांना संरक्षणाची साथ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




पिडिलाइट इंडस्ट्रीज लिमिटेडचा वॉटरप्रूफिंग सोल्यूशन्स ब्रँड डॉ. फिक्सिट ने महाराष्ट्रातील सर्वाधिक पूजनीय आध्यात्मिक यात्रांपैकी एक असलेल्या पंढरपूर वारी 2026 मध्ये सहभागी झालेल्या वारकऱ्यांना सहकार्य करून घरांच्या पलीकडे जाऊन संरक्षणाचे आपले वचन अधिक दृढ केले. डॉ. फिक्सिट पंढरपूर वारी 2026 या ऑन-ग्राउंड उपक्रमांतर्गत पावसाळ्यातील वातावरणात यात्रा करणाऱ्या भाविकांचा प्रवास अधिक आरामदायी व्हावा, यासाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

या उपक्रमाचा एक भाग म्हणून, चालते छत (Walking Roof Shades) वारकऱ्यांसोबत संपूर्ण प्रवासात होते, ज्यामुळे त्यांना पावसापासून संरक्षण मिळाले आणि मार्गात विश्रांतीचे क्षण अनुभवता आले. तसेच, तंबूंची व्यवस्था करून भाविकांना थांबून विश्रांती घेण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली, तर विशेष ड्रायिंग स्टेशनमुळे पावसात भिजल्यानंतर स्वतःला कोरडे करून ताजेतवाने होण्याची सुविधा मिळाली. याशिवाय, अनिश्चित हवामानापासून अतिरिक्त संरक्षण मिळावे म्हणून रेनकोटचेही वितरण करण्यात आले, ज्यामुळे वारकऱ्यांना त्यांचा प्रवास अधिक आरामात सुरू ठेवता आला.

या उपक्रमाविषयी बोलताना पिडिलाइट इंडस्ट्रीज लिमिटेडचे मुख्य विपणन अधिकारी श्री. संदीप तनवानी म्हणाले, "पिडिलाइटमध्ये आम्ही मानतो की, जिथे लोकांना संरक्षणाची सर्वाधिक गरज असते तिथे ते पोहोचले, तरच त्याला खरा अर्थ प्राप्त होतो. यावर्षी डॉ. फिक्सिटच्या माध्यमातून आम्ही पंढरपूर वारीतील आमच्या वचनबद्धतेला आणखी एक पाऊल पुढे नेत प्रथमच मोबाईल ड्रायिंग स्टेशनची सुविधा सुरू केली आहे, ज्यामुळे पावसाळ्यात वारकऱ्यांना स्वतःला कोरडे करून अधिक सहजतेने त्यांची यात्रा पुढे सुरू ठेवता येईल. यासोबतच, चालते छत, संरक्षणात्मक रेन गिअर आणि तंबूंच्या माध्यमातूनही आम्ही यात्रेदरम्यान भाविकांना सहकार्य करत आहोत. या पवित्र परंपरेचा भाग होण्याचा आणि श्रद्धा व भक्तीच्या या अद्वितीय प्रवासात वारकऱ्यांसोबत उभे राहण्याचा आम्हाला अभिमान आहे." या उपक्रमात ऑन-ग्राउंड अनुभव अधिक समृद्ध करण्यासाठी आर्च गेट्स, मनगटी पट्ट्या (Wristbands) आणि टी-शर्ट्स यांचाही समावेश करण्यात आला होता, ज्यामुळे संपूर्ण यात्रेदरम्यान वारकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सहकार्याला अधिक बळ मिळाले. गेल्या 25 वर्षांहून अधिक काळापासून, डॉ. फिक्सिटने आपल्या वॉटरप्रूफिंग कौशल्याच्या माध्यमातून भारतभरातील 1,000 कोटी चौरस फूटांहून अधिक बांधकाम क्षेत्राचे संरक्षण केले आहे. पंढरपूर वारीशी असलेल्या या सहभागाद्वारे कंपनीने संरक्षणाचे आपले वचन केवळ इमारतींपुरते मर्यादित न ठेवता लोकांपर्यंत आणि समाजापर्यंत विस्तारले असून, त्यांच्या प्रवासात अर्थपूर्ण सहकार्य करण्याची परंपरा कायम



## कृषि उत्पन्न बाजार समिती, दौंड जिल्हा पुणे

### निविदा सुचना

खालील कामांच्या सिलबंद निविदा/कोटेशन सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, दौंड ता. दौंड जिल्हा पुणे हे अनुभवी व नोंदणीकृत कंत्राटदारांकडून/पुरवठादारांकडून मागवित आहेत. प्लॅन, इस्टीमेट प्रत व कामांची माहिती कृषि उत्पन्न बाजार समिती, दौंड यांचे मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत बुधवार सुट्टीचा दिवस सोडुन देण्यात येईल. प्लॅन, इस्टीमेट प्रत दिनांक ०८/०९/२०२६ पर्यंत देण्यांत येईल. निविदा/कोटेशन दिनांक ०८/०९/२०२६ पर्यंत स्विकारले जाईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|
| १ | उपबाजार आवार केडगांव कांदा शेड बांधकाम | ९९७३६८/- | १ महिना |
| २ | उपबाजार आवार केडगांव डाळींब शेड बांधकाम | ९९५३९७/- | १ महिना |

१. महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचे जीएसटी अंमलबजावणी नंतर शासकिय कंत्राटात होणारा बदल याबाबतचे दि.१९/०७/२०१८ मधील परिपत्रकातील सुचनांचे पालन करावे. (संकेतांक क्रमांक २०१७०८२१११०८४६८००५)
२. मंजुर अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा जास्त दराच्या निविदा मान्य करण्यात येणार नाहीत.
३. अंदाजपत्रकामध्ये जोडलेल्या नकाशा प्रमाणे व स्पेसिफिकेशन प्रमाणे कामे करवीत.
४. प्रत्यक्ष झालेल्या कामाची मोजमापे घेतल्यानंतर समितीच्या आर्किटेक्ट इंजिनियर यांच्या सर्टिफिकेट नुसारच बीले सादर करावीत. कुठल्याही सबबीवर कामापोटी अ‍ॅडव्हान्स मिळणार नाही.
५. कामे निवीदेतील नमुद मुदतीत पुर्ण करावीत.
६. बीलाच्या जी.एस.टी. ची रक्कम भरण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.
७. ठेकेदारांनी गौणखनिजाची वाहतुक ही मंजुर गटातुनच करावी व त्यासाठी आवश्यक रॉयल्टी कामापुर्वीच अदा करावी.
८. मा. सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, दौंड यांची परवानगी स्वाक्षरी असलेल्याच निविदा/कोटेशन दाखल करुन घेतल्या जातील.
९. कोणाचीही निविदा/कोटेशन अथवा सर्व निविदा/कोटेशन कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार समिती राखुन ठेवीत आहे.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| श्री. मोहन लक्ष्मण काटे | श्री. शरद बापु कोळपे | श्री. गणेश अंकुश जगदाळे |
| सचिव | उपसभापती | सभापती |

## थोडक्यात पण महत्वाचे



## सकल जैन वधू-वर परिचय संस्थेच्या संकेतस्थळाचे उद्घाटन

- सकल जैन वधू-वर परिचय संस्थेच्या संकेतस्थळाचे उद्घाटन ४१ वर्षांच्या कार्याला डिजिटल बळ

पुणे (आरंभ पर्व) : जैन समाजातील विवाह जुळवणीचे ४१ वर्षांपासून कार्य करणाऱ्या जैन वधू-वर परिचय संस्थेच्या नवीन संकेतस्थळाचे उद्घाटन व सर्व जैन पंथीय ऑनलाईन मेळावा उदघाटन महेंद्र शहा यांच्या हस्ते झाले. श्वेतांबर, दिगंबर, स्थानकवासी व तेरापंथ या चारही संप्रदायांचे ज्येष्ठ येथे उपस्थित होते. संस्थेचे मार्गदर्शक महेंद्रभाई शहा, अध्यक्ष मुकेश शहा, रोहित जवेरी, भावेश शहा, योगेश शहा, पृथ्वीराजबधोका, अनिल वखारिया अचल जैन, विलासकुमार बाफना,संपत गादिया, नवीनशहा, दिलीप मेहता उपस्थित होते. संकेतस्थळामुळे देश-विदेशातील जैन कुटुंबांना घरबसल्या मुला-मुलींची जीवनवृत्ते पाहणे व नोंदणी करणे शक्य होणार आहे. ५०० पेक्षा वधु-वरांनी संकेतस्थळवर नोंदणी केली.

## 'पाव्हणं करू नका माझा नाद'; पुण्यात गाण्याचा ग्रँड लाँच!



पुणे (आरंभ पर्व) : मराठी संगीतसृष्टीत एकापाठोपाठ एक ब्लॉकबस्टर गाणी देणाऱ्या 'विश्वाजीत प्रॉडक्शन्स' आणि 'डॉक्टर अजितसिंह पाटील फिल्म्स अँड एंटरटेनमेंट इंडिया'चे बहुप्रतिक्षित 'पाव्हणं करू नका माझा नाद...' हे नवे गाणे अधिकृतरीत्या रसिकांच्या भेटीस आले आहे. पुण्यातील सिंहगड रोडवरील कॉर्पोरेट कार्यालयात आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात या गाण्याचा ग्रँड लाँच सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. 'जानू विना रंगच नाय', 'देवाने बनवलं फक्त माझ्यासाठीच ग' आणि 'बाप्पा मोरया रे' या सुपरहिट गाण्यांच्या यशानंतर टीमने पुन्हा एकदा नवा विक्रम रचत अस्सल मराठमोळा ठसका रसिकांसमोर आणला आहे. या गाण्यात 'बिग बॉस' फेम धनंजय पवार (डीपी) आणि ग्लॅमरस अभिनेत्री ऐश्वर्या जाधव मुख्य भूमिकेत झळकले आहेत. पारंपरिक लावणीचा साज आणि आधुनिक उडत्या संगीताचा संगम असलेल्या या गाण्याला गायिका राधा खुडे यांच्या खणखणीत आवाजाने चारचांद लावले आहेत. समीर पठाण यांचे गीत-संगीत, विशाल मोहिते यांचे संगीत संयोजन, समीर निकम यांचे प्रभावी दिग्दर्शन आणि दत्तात्रय ठोसरे यांच्या सिनेमॅटोग्राफीमुळे गाण्याची दृश्य-श्राव्य बाजू अत्यंत दर्जेदार झाली आहे.



## १ सप्टेंबरला पशुसंवर्धन आयुक्तालयावर हजारो पशुपालकांचे धडक आंदोलन

- शासन निर्णय अंमलबजावणी व भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या चौकशीसाठी निवेदन

पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्रातील पशुपालक शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी २२ जुलै २०२४ व ३१ जुलै २०२५ च्या शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी व्हावी, या मागणीसाठी १ सप्टेंबर २०२६ रोजी पशुसंवर्धन आयुक्त कार्यालय, औंध, पुणे येथे राज्यभरातून हजारो पशुपालक शेतकरी एकत्र येऊन निवेदन देणार आहेत. या संदर्भात आज पुणे पत्रकार भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत माहिती देण्यात आली. यावेळी पशुसंवर्धन आयुक्त कार्यालय कसे आहे ते पाहण्यासाठी आणि शासन निर्णयाची अंमलबजावणी का होत नाही? तसेच ज्या अधिकाऱ्यांनी अंमलबजावणीत पळवाटा शोधल्या, त्यांचे खाद्य व औषध कंपन्यांशी आर्थिक संबंध आहेत का? याची उच्चस्तरीय चौकशी झाली पाहिजे, अशी ठाम मागणी करण्यात आली.

## नामदेव भूरूक यांना 'समाजरत्न' पुरस्काराने सन्मानित



पुणे (आरंभ पर्व) : सिंहगड रोड परिसरातील माणिकबाग येथील सिद्धार्थ हॉलमध्ये गुरुकृपा संगीत कला सामाजिक संस्था, पुणे यांच्या वतीने आयोजित विशेष पुरस्कार सोहळ्यात सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल श्री. नामदेव भूरूक यांना प्रतिष्ठेचा 'समाजरत्न' पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. डॉ. रमेश चांदेकर, पंडित रविंद्र यादव आणि गायनाचार्य संजय काठाळे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी श्री. भूरूक यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत त्यांच्या कार्याची दखल घेणे ही समाजासाठी प्रेरणादायी बाब असल्याचे सांगितले. या पुरस्कार सोहळ्यात संगीत आणि कला क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या अनेक कलावंतांचाही 'कला गौरव' पुरस्कार देऊन विशेष सन्मान करण्यात आला. यामध्ये सौ. अमृता मानमोडे, सौ. शिल्पा देशपांडे, सौ. वैशाली पोकळे, सौ. अनुजा कल्याणकर, सौ. कल्पना पाटील, सुहानी गायकवाड, दीपक मगर, स्वप्निल निंवगुणे तसेच भजन क्षेत्रात आपल्या गायकीने वेगळी ओळख निर्माण करणारे भजनसम्राट रामचंद्र यादव यांचा समावेश होता. संगीत आणि कला ही समाजाला एकत्र बांधणारी शक्ती असून, या क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेल्या कलावंतांच्या योगदानाची दखल घेणे आवश्यक आहे. अशा पुरस्कारांमुळे कलाकारांना नवचैतन्य आणि प्रेरणा मिळते, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमात विविध मान्यवर, संगीतप्रेमी आणि कलावंत मोठ्या संख्येने उपस्थित होते. गुरुकृपा संगीत कला सामाजिक संस्थेच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.

# अध्यक्षपदापासून नगरसेवकपदापर्यंत सचिन मोरेंचा जनसेवेचा वसा कौतुकास्पद

### आमदार भीमराव तापकीर : आमदार तापकीरांच्या वाढदिवसानिमित्त सिंहगड रस्त्यावर भव्य रक्तदान शिबिर; ५०० हून अधिक रक्तदात्यांचा सहभाग

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भाजपचे नगरसेवक तथा सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे अध्यक्ष सचिन (रावसाहेब) मोरे यांनी अध्यक्षपदापासून नगरसेवकपदापर्यंत प्रत्येक जबाबदारीत जनसेवेला प्राधान्य दिले आहे. तळागाळातील नागरिकांशी नाळ जोडून त्यांनी सिंहगड रोड परिसरात सातत्याने लोकहिताची कामे केली आहेत, अशा शब्दांत खडकवासला मतदारसंघाचे आमदार भीमराव (आण्णा) तापकीर यांनी सचिन मोरे यांच्या कार्याचा गौरव केला. आमदार भीमराव तापकीर यांच्या १ सप्टेंबर रोजी होणाऱ्या वाढदिवसानिमित्त सिंहगड





रस्त्यावरील माणिकबाग येथील ग्रँड हॉरिझॉन येथे सचिन मोरे यांच्या पुढाकाराने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला परिसरातील तरुण आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून, ५०० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले. शिबिरास भेट देऊन आमदार तापकीर यांनी रक्तदात्यांचे मनोबल वाढविले. रक्तदान केल्याने कोणताही अशक्तपणा येत नसून शरीरात अल्पावधीतच नवीन रक्त तयार होते, हा गैरसमज दूर करून नागरिकांनी नियमितपणे रक्तदानासाठी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले. आपल्या एका रक्तदानामुळे एखाद्या गरजू रुग्णाला जीवनदान मिळू शकते, असेही ते म्हणाले. यावेळी भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी सचिन मोरे यांच्या उपक्रमाचे कौतुक केले. भाजपमध्ये नेत्यांचे वाढदिवस सामाजिक उपक्रमांद्वारे साजरे करण्याची परंपरा असून रक्ताचा तुटवडा असताना अशा उपक्रमांमुळे अनेक रुग्णांना मोठा आधार मिळतो, असे त्यांनी सांगितले. सचिन मोरे यांनी सांगितले की, आमदार भीमराव तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त गेल्या पाच वर्षांपासून रक्तदान, आरोग्य शिबिर आणि वृक्षारोपणासारखे विविध समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. भविष्यातही सामान्य जनतेच्या सेवेसाठी कटिबद्ध राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी विजय मते, रमेश गायकवाड, अनिल मते, कोमल सतीश कुटे, निखिल धावडे, राजूदादा कुटे, अभिजित धावडे, तुषार पोकळे, अॅड. नरसिंग लगड यांच्यासह कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विश्वजीत मोरे, गणेश देशमुख, ओम पाटील, अमोल पाटील, मंगेश खराडे, वैभव कदम, पूजा घाडगे, ओमकार जागडे व प्रदीप थोटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## बार्टी संशोधक विद्यार्थ्यांचा लढा तीव्र; राहुल डंबाळे यांचे उद्यापासून उपोषण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) फेलोशिपधारक अनुसूचित जातीच्या संशोधक विद्यार्थ्यांचे गेल्या काही दिवसांपासून समाजकल्याण आयुक्त कार्यालयासमोर तीव्र आंदोलन सुरू आहे. १९ ऑगस्टपासून धरणे आंदोलन, तर २४ ऑगस्टपासून आमरण उपोषणास बसलेल्या या विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची आणि मागण्यांची प्रशासनाने अजूनही दखल घेतलेली नाही. शासनाच्या जाचक अटींमुळे गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापासून वंचित ठेवले जात असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून जीवाची बाजी लावून उपोषणास बसलेल्या या विद्यार्थ्यांना जाहीर पाठिंबा देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्या मान्य करून घेण्यासाठी रिपब्लिकन पक्षाचे नेते राहुल डंबाळे उद्यापासून स्वतः उपोषण आंदोलनाला बसणार आहेत. प्रशासनाच्या आणि सरकारच्या ढिम्म कारभाराचा तीव्र निषेध करण्यासाठी आणि हक्काची फेलोशिप मिळवण्यासाठी उद्या सर्व आंदोलक विद्यार्थी आणि कार्यकर्ते मिळून समाजकल्याण आयुक्तालयाला 'टाळे ठोको' आंदोलन करणार आहेत.

## आमदार भीमराव तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त 'जन आरोग्यवारी'

### नगरसेवक हरिदास चरवड यांचा जनहितार्थ आरोग्य उपक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त नगरसेवक हरिदास चरवड यांच्या पुढाकाराने 'जन आरोग्यवारी' मोहिमेअंतर्गत नऱ्हेगाव येथील स्वामी अंगण सोसायटीमध्ये आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.



या शिबिरात नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच नागरिकांना आवश्यक वैद्यकीय सल्ला व आरोग्यविषयक मार्गदर्शन देण्यात आले. नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला.

सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांच्या आरोग्याला प्राधान्य देणारा हा उपक्रम सेवा आणि संवेदनशीलतेचा आदर्श ठरला. 'आरोग्याची काळजी, समाजाची जबाबदारी' या भावनेतून जन आरोग्यवारीच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्यात आली.

यावेळी प्रभाग अध्यक्ष राजूदादा कुटे, चेअरमन संतोष कदम, सेक्रेटरी स्वप्नील वाडकर, खजिनदार प्रशांत पाटील, सदस्य विजय देवदारे, विजय गुमते, सुनील माळी, राकेश नलावडे, दत्ता भोसले, तसेच सौ. सुषमा कदम, सौ. शैलजा भोसले आदी उपस्थित होते. नगरसेवक हरिदास चरवड यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या आरोग्य शिबिरामुळे नागरिकांना त्यांच्या आरोग्याची तपासणी करून घेण्याची तसेच आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन मिळविण्याची संधी मिळाली.

## बहिणीच्या राखीने दिले संघर्षाचे बळ; जनतेच्या हक्कासाठी भावाचा लढा कायम!

### रक्षाबंधनाचा सण आंदोलनस्थळी साजरा; धायरी-नऱ्हेच्या रस्त्यांसाठी राजाभाऊ लायगुडे नवव्या दिवशीही ठाम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रक्षाबंधन म्हणजे बहिण-भावाच्या अतूट नात्याचा सण... बहिण भावाच्या मनगटावर राखी बांधते आणि भाव तिच्या रक्षणाचे वचन देतो. मात्र यंदा पुण्यातील एका आंदोलनस्थळी या सणाने वेगळाच अर्थ घेतला. बहिणीने राखी बांधली ती केवळ आपल्या भावाच्या संरक्षणासाठी नव्हे, तर हजारो नागरिकांच्या हक्कासाठी सुरू असलेल्या त्याच्या संघर्षाला बळ देण्यासाठी! धायरी-नऱ्हे परिसरातील रखडलेल्या डी.पी. रस्त्यांच्या प्रश्नासाठी प्रभाग ३४ चे नगरसेवक राजाभाऊ लायगुडे पुणे महापालिकेत सलग नवव्या दिवशी ठिय्या आंदोलन करत आहेत. परिसरातील नागरिकांना वाहतूक कोंडी, अपुरे रस्ते आणि



आपत्कालीन परिस्थितीत निर्माण होणाऱ्या गंभीर अडचणींमुळे हा लढा त्यांनी हाती घेतला आहे.

रक्षाबंधनाच्या दिवशी राजाभाऊ घरी परतून कुटुंबासोबत सण साजरा करतील, अशी अपेक्षा होती. मात्र जनतेच्या प्रश्नासाठी सुरू केलेले आंदोलन सोडून जाणे त्यांना मान्य नव्हते. अखेर बहिणींनीच आंदोलनस्थळ गाठले आणि महापालिकेच्या दालनात भावाचे औक्षण करून त्याच्या मनगटावर राखी बांधली. हा क्षण उपस्थितांच्या डोळ्यांतही पाणी आणणारा ठरला. "माझा भाऊ फक्त आमचा रक्षक नाही, तर हजारो नागरिकांच्या हक्कासाठी लढणारा योद्धा आहे. आजची राखी त्याला जनतेसाठी आणखी ताकदीने लढण्याचे बळ देवो," अशी भावना बहिणींनी व्यक्त केली. यावेळी राजाभाऊ लायगुडे भावूक होत म्हणाले, "माझ्यासाठी सणापेक्षा जनतेचे प्रश्न मोठे आहेत. नागरिकांच्या सुरक्षित प्रवासासाठी आवश्यक रस्ते मिळेपर्यंत हा संघर्ष थांबणार नाही. बहिणींनी बांधलेली ही राखी माझ्या मनगटावरचा धागा नसून जनतेच्या विश्वासाची ताकद आहे." रक्षाबंधनाच्या दिवशी घरी न जाता आंदोलनस्थळी राखी बांधून घेणाऱ्या या भावाने एक वेगळाच संदेश दिला आहे. नगरसेवक राजाभाऊ लायगुडे यांच्या या कृतीने प्रभागातील नागरिकासह सर्वजण भारावून गेले.

## खामगावला अदानी उद्योग समूहाच्या प्रकल्पा विरोधात ग्रामसभेत ठराव



**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

खामगाव ता.जुन्नर येथील ग्रामसभेत पेसा क्षेत्र आणि माणिकडोह धरणाचे पाणी वाचवण्यासाठी माळशेज घाट परिसरात होणाऱ्या अदानी उद्योगसमूहाच्या १,५०० मेगावॅट जलविद्युत प्रकल्पाच्या विरोधात ठराव करण्यात आला. ग्रामसभा शांततेत आणि उत्साहात संपन्न झाली. ग्रामसभांमधील वाद-विवाद, राजकीय गट-तट, एकमेकांवर होणारे आरोप-प्रत्यारोप आणि विनाकारण तक्रारी याच्या अनेक घटना घडत असताना खामगाव गावाने या सर्वांना छेद देत एक आदर्श निर्माण केला आहे.येथील ग्रामसभेला गावातील विविध वाड्या-वस्त्यांमधून ३०० हुन अधिक युवक व पुरुष तसेच १०० हुन अधिक महिला मोठ्या उत्साहाने उपस्थित होत्या. ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी लोकनियुक्त सरपंच निलम अजिंक्य घोलप होत्या.सभेचे कामकाज ग्रामसेवक प्रतिक्षा ऊतळे यांनी पाहिले.

## महिलांसाठी आयोजित श्रावण यात्रा उत्साहात संपन्न

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

श्रावणातील तिसऱ्या गुरुवारचे औचित्य साधत पुणे महानगरपालिकेचे माजी उपमहापौर नगरसेवक अॅड. प्रसन्नदादा जगताप यांच्या वतीने प्रभागातील महिला भगिनींसाठी आयोजित करण्यात आलेली श्रावण यात्रा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. गेल्या अनेक वर्षांची परंपरा जपत आयोजित करण्यात आलेल्या या यात्रेला महिला भगिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या यात्रेदरम्यान महिला भगिनींनी श्री केतकावळे बालाजी, श्री क्षेत्र नारायणपूर, श्री क्षेत्र कोडीत येथील मंदिर, श्री सोपानकाका समाधी मंदिर, श्री क्षेत्र कानिफनाथ महाराज मंदिर, बोपगाव तसेच कोंढवा येथील इस्कॉन मंदिराचे दर्शन घेतले. विविध देवस्थानांचे दर्शन घेतल्यानंतर श्री क्षेत्र कानिफनाथ महाराज मंदिर येथे महिला भगिनींनी महाप्रसादाचा लाभ घेतला. श्रावणातील पवित्र वातावरणात एकत्रित देवदर्शन, भजन-भक्ती आणि आध्यात्मिक आनंदाचा अनुभव महिलांनी घेतला.



- माजी उपमहापौर अॅड. प्रसन्नदादा जगताप यांच्या वतीने आयोजन

यात्रेदरम्यान महिला भगिनींच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. प्रभागातील महिला भगिनींना श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्मिक समाधानाचा अनुभव मिळावा, या उद्देशाने अॅड. प्रसन्नदादा जगताप यांच्या वतीने या यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. महिलांना एकत्र येऊन धार्मिक व आध्यात्मिक वातावरणाचा आनंद घेता यावा, यासाठी करण्यात आलेला हा उपक्रम अत्यंत आनंददायी आणि अविस्मरणीय ठरला. यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहभागी झालेल्या सर्व महिला भगिनींचे अॅड. प्रसन्नदादा जगताप यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

# कानिफनाथ गडावर ३३ वर्षांची अन्नदान परंपरा उत्साहात

### अॅड. प्रसन्नदादा जगताप यांच्या पुढाकाराने आयोजन; ६,००० हून अधिक भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे लक्ष्मण साबळे: श्रावणातील तिसरा गुरुवार आणि नारळी पौर्णिमेच्या पवित्र पर्वाचे औचित्य साधत श्री क्षेत्र कानिफनाथ गड, बोपगाव येथे भव्य महाप्रसाद व धार्मिक सोहळा भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. पुणे महानगरपालिकेचे माजी उपमहापौर नगरसेवक अॅड. प्रसन्नदादा जगताप यांच्या पुढाकाराने व संकल्पनेतून सुरू असलेल्या अखंड अन्नदान सेवेला यंदा ३३ वर्षे पूर्ण झाली.

पहाटेपासूनच 'कानिफनाथ महाराज की जय'च्या जयघोषाने संपूर्ण गड परिसर दुमदुमून गेला होता. नारळी पौर्णिमेनिमित्त पहाटे ५ वाजता कानिफनाथ महाराजांच्या संजीवन समाधीवर महाअभिषेक व विशेष पूजा करण्यात आली. त्यानंतर दिवसभर गडावर भाविकांची मोठी गर्दी झाली होती. शिस्तबद्ध पद्धतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. ६,००० हून अधिक भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. ३३ वर्षांपूर्वी सुरू झालेल्या



या अन्नदान सेवेमागील आठवणी सांगताना अॅड. प्रसन्नदादा जगताप म्हणाले, "कॉलेजच्या दिवसांत मित्रांकडून प्रत्येकी थोडे-थोडे पैसे गोळा करून अवघ्या २०० रुपयांच्या वर्गणीतून कानिफनाथ महाराजांच्या चरणी अन्नदानाची सुरुवात झाली होती. आज तीन दशकांनंतरही हा सेवाभाव अधिक दृढ झाला आहे." "बोपगाव आणि येथील ग्रामस्थांशी गेल्या २५-३० वर्षांत आमचे कौटुंबिक नाते जोडले गेले आहे. नाथचरणी माथा टेकवून भाविकांच्या मुखात अन्नाचा घास घालण्यात मिळणारे आत्मिक समाधान हेच आमच्यासाठी सर्वस्व आहे," असेही त्यांनी सांगितले.



कानिफनाथ देवस्थान पंचकमिटी ट्रस्टचे अध्यक्ष सुरेश नानासाहेब फडतरे यांनी अॅड. प्रसन्नदादा जगताप यांच्या अविरत सेवेचा गौरव केला. ते म्हणाले, "३३ वर्षांपूर्वी लावलेले सेवेचे छोटे रोपटे आज वटवृक्ष झाले आहे. गडाच्या विविध विकासकामांमध्ये, भाविकांच्या सुविधांसाठी आणि धार्मिक उपक्रमांत जगताप परिवाराचे योगदान नेहमीच मोठे व प्रेरणादायी राहिले आहे." यावेळी देवस्थान पंचकमिटी ट्रस्टचे उपाध्यक्ष दीपक किसनराव फडतरे, सचिव महादेव हरिश्चंद्र फडतरे, खजिनदार सोनबा कान्हू फडतरे तसेच विश्वस्त मंडळातील ज्ञानोबा रामचंद्र फडतरे, जयवंत कृष्णा फडतरे, नागेश भानुदास (दादा) फडतरे, शिवाजी मारुती जगदाळे, प्रकाश काशिनाथ फडतरे, प्रकाश काशिनाथ फडतरे (आप्पा), नितीन गणपत फडतरे, मंगेश आनंदराव फडतरे आणि रमेश बापूसाहेब फडतरे उपस्थित होते. तसेच पांडुरंग बाठे आणि देवस्थानचे व्यवस्थापक संतोष गोफणे यांनी आयोजनात महत्त्वपूर्ण सहभाग घेतला.

बोपगाव ग्रामस्थ, पडतरे परिवार, पौर्णिमा मंडळ, स्थानिक तरुण मंडळे, महिला बचत गटांचे प्रतिनिधी तसेच पुणे शहर व पुरंदर तालुक्यातील भाविकांनी या अन्नदान सेवेत सहभाग घेतला. ३३ वर्षांपासून अखंड सुरू असलेली ही अन्नदानाची परंपरा म्हणजे केवळ महाप्रसादाचे आयोजन नसून 'सेवा हीच ईश्वरपूजा' या विचाराची जपणूक करणारा प्रेरणादायी सेवायज्ञ ठरला आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com
• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.